# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) २७ नोव्हेंबर २०१६

**नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी सरासरी ७० टक्के मतदान**

मुंबई, दि.२७: राज्यातील २५ जिल्ह्यांमधील १६४ नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आणि १४७ थेट नगराध्यक्षपदांच्या निवडणुकांसाठी आज सरासरी ७० टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, राज्यात पहिल्या टप्प्यातील १४७ नगरपरिषदा व १७ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज मतदान झाले. नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या एकूण ३ हजार ७०५; तर थेट नगराध्यक्ष पदांच्या १४७ जागांसाठी मतदारांनी मतदान केले. त्यासाठी ७ हजार ६४१ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. उद्या (ता. २८) सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीस सुरवात होईल. निकालानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल.

**प्राथमिक अंदाजानुसार जिल्हानिहाय झालेल्या मतदानाची सरासरी टक्केवारी अशी (नगरपरिषदा व नगरपंचायतींची संख्या):**

**कोकण विभाग: पालघर (३)**- ८०, **रायगड (९)**- ८८, **रत्नागिरी (५)**- ८८ व **सिंधुदुर्ग (४)**- ६७.

**पुणे विभाग: सातारा (१४)**- ८३, **सांगली (८)**- ८४, **सोलापूर (९)**- ७३ व **कोल्हापूर (९)**- ७९.

**नाशिक विभाग: नाशिक (६)**- ७९, **धुळे (२)**- ७०, **नंदुरबार (१)**- ७४, **जळगाव (१३)**- ६८ व **अहमदनगर (८)**- ८३.

**औरंगाबाद विभाग:** जालना **(४)**- ५९, **परभणी (७)**- ७६, **हिंगोली (३)**- ६८, **बीड (६)**- ७४ व **उस्मानाबाद (८)**- ६८.

**अमरावती विभाग: अमरावती (९)**- ७२, **अकोला (५)**- ६७, **बुलडाणा (९)**- ७९, **वाशीम (३)**- ६४, **यवतमाळ (८)**- ६०.

**नागपूर विभाग: वर्धा (६)**- ६०, **चंद्रपूर (५)**- ६३.

**एकूण सरासरी- (१६४)**- ७०.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)

०-०-०